## जाहीर सिलबंद दरपत्रके (दुसऱ्यांदा मुदतवाढ)

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण घटकातील लोणावळा शहर पोलीस ठाणे हददीमध्ये वाहतुक आराखडयाच्या अनुषंगाने हददीमध्ये रस्त्यावर किंवा रस्त्याच्या बाजुला अनधिकृत पार्कीग केलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी दोन चाकी वाहने उचलुन आणणेकरीता एक क्रेन वाहन आणि चार चाकी वाहन टो करून ओढून आणणेकरीता एक हायड्रोलीक क्रेन अशी एकूण ०२ (दोन) क्रेन वाहने एक वर्षाचे वार्षिक भाडे करारावर तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा करणेबाबत इच्छुक व अधिकृत मान्यताप्राप्त पुरवठा धारकांकडुन सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दरपत्रकाची संपुर्ण माहिती, अटी व शर्ती www.puneruralpolic.gov.in या वेब साईटवर फक्त पाहण्यास उपलब्ध आहेत.

पुणे
दिनांक १४/०६/२०२३

पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण
पुणे-८

(अंकित गोयल) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

crane LONAVALA

Scanned with OKEN Scanner

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे ४११ ००८
दूरध्वनी क्रमांक ०२०- २५६५७८७८
फॅक्स क्र. ०२०-२५६७४६४१
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in
संकेतस्थळ www.puneruralpolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.पशा-११/टोईंग व्हॅन भाडेदरपत्रके /२०२३-२४/ 7045 पुणे, दिनांक 14/०६/२०२३

## सिलबंद दरपत्रक सुचना

**विषय:** सिलबंद दरपत्रक मागविणेबाबत..

पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण घटकातील लोणावळा शहर पोलीस ठाणे हददीमध्ये वाहतुक आराखडयाच्या अनुषंगाने हददीमध्ये रस्त्यावर किंवा रस्त्याच्या बाजुला अनधिकृत पार्कीग केलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी दोन चाकी वाहने उचलुन आणणेकरीता एक क्रेन वाहन आणि चार चाकी वाहन टो करून ओढून आणणेकरीता एक हायड्रोलीक क्रेन अशी एकूण 02 (दोन) क्रेन वाहने एक वर्षाकरीता वार्षिक भाडे करारावर तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा करणेबाबत खालील विहित केलेल्या अटी व शर्तीना अधीन राहून नोंदणीकृत व्यावसायिक पुरवठादार / इच्छुक व अधिकृत मान्यताप्राप्त पुरवठा धारकांकडुन सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

**अ) साहित्य / वस्तुचे वर्णन :**

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| 1 | लोणावळा शहर पोलीस ठाणे हददीमध्ये वाहतुक आराखडयाच्या अनुषंगाने हददीमध्ये रस्त्यावर किंवा रस्त्याच्या बाजुला अनधिकृत पार्कीग केलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी दोन चाकी वाहने उचलुन आणणेकरीता एक क्रेन वाहन आणि चार चाकी वाहन टो करून ओढून आणणेकरीता एक हायड्रोलीक क्रेन अशी एकूण 02 (दोन) क्रेन वाहने एक वर्षाकरीता वार्षिक भाडे करारावर पुरवठा करणेबाबत. |

**ब) अटी व शर्ती :-**

1. क्रेन वाहनाची नोंदणी अलिकडील काळातील असावी. सदर वाहनांचे संपूर्ण कागदपत्रे (उदा. रजिस्ट्रेशन, पी.यु.सी., इन्शुरन्स, फिटनेस, वाहनाचा टॅक्स इ.) वेळोवेळी परिपूर्ण केलेले असावेत.
2. क्रेन वाहन मालकाने जी.एस.टी. प्रमाणपत्र पॅनकार्ड सादर करावे तसेच क्रेन वाहनाचे अनुषंगाने झालेल्या उत्पन्नाचे आयकर भरलेबाबतचे तीन वर्षाचे विवरणपत्र सादर करावे.
3. खाजगी क्रेन वाहन मालक त्यांच्या वाहनावरील सर्व कर्मचाऱ्यांचे फोटो व चारित्र्याबाबत दाखला, कर्मचारी वास्तव्य करीत असलेल्या स्थानिक पोलीस ठाण्याकडून प्राप्त केलेला असावा. क्रेन वाहन मालक / चालक व कर्मचारी यांचा संपूर्ण तपशील सादर करावा.
4. क्रेन वाहनावर जी.पी.एस. पी.ए.सिस्टीम व पुढे / मागे कॅमेरे असावेत. तसेच वाहनावरील कर्मचारी रात्रीचे वेळी स्वयंप्रकाशी गणवेष (प्लुरोसेन्ट जॅकेट) वापरतील.
5. क्रेनचे दिवे (पार्किंग लाईट, हेड लाईट, टेल लाईट) सुस्थितीत असावेत.
6. क्रेन वाहन चालकास कमीत कमी 03 वर्षे क्रेन वाहन चालविण्याचा अनुभव असावा. चालकाकडे एल.एम.व्ही. व्यावसायिक / मालवाहू (ट्रान्सपोर्ट) वाहन चालक परवाना आवश्यक आहे.



Scanned with OKEN Scanner

7. क्रेन वाहनावरील कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा 18 वर्षे पुर्ण असावी. तसेच क्रेन वाहनावरील कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असावा.
8. क्रेन वाहन तांत्रिक दृष्ट्या सक्षम असावे.
9. एका क्रेनवर एकच चालक राहील, एखाद्या अपरिहार्य कारणास्तव दोन चालकांना परवानगी देण्यात येईल. क्रेनवरील चालक व गाडया उचलणारे कर्मचारी यांना एकसारखा निळया रंगाचा निटनेटका गणवेष असावा. त्यावर ON POLICE DUTY अशी अक्षरे लिहीलेली असावीत. क्रेनवरील कर्मचाऱ्यांनी केस व्यवस्थित कापलेले असावेत. ते सज्ञान असून त्यांची वयोमर्यादा पूर्ण असावी.
10. क्रेन कर्मचाऱ्यांचे फोटो संपूर्ण माहिती ते राहत असलेल्या स्थानिक पोलीस ठाणेकडील चारित्र्य पडताळणी दाखला प्राप्त करून वाहतूक शाखेस सादर करावा. वाहन मालकाने क्रेन वरील कर्मचाऱ्यांना पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा यांचे स्वाक्षरीचे विहीत नमुन्यातील ओळखपत्र देण्यात येईल. क्रेन कर्मचाऱ्यांना रात्रीचे वेळी स्वयंप्रकाशी जॅकेट क्रेन व्यावसायिक यांनी पुरवावे. त्याचे खर्चाची जबाबदारी क्रेन व्यवसायिक यांची राहील.
11. क्रेन सुस्थितीत असलेबाबतची कागदपत्रे अद्यावत नोंदीसह आर.टी.ओ. कार्यालय यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. (उदा. रजिस्ट्रेशन, पी.यु.सी., इन्शुरन्स, फिटनेस, वाहनाचा टॅक्स व इतर आवश्यक कागदपत्रे ) क्रेन व्यावसायासाठी लागणारे सर्व परवाने / मंजूरी घेणेची कार्यवाही क्रेन मालक यांनी स्वत: करावयाची आहे. तसेच आयकर संदर्भात आयकर रिटर्न भरलेबाबत विवरणपत्र सादर करावे.
12. क्रेन वाहनांचे दिवे (पार्किंग लाईट, हेड लाईट, टेल लाईट) व लाऊड स्पीकर, माईक, सायरन इ. सुस्थितीत असावेत.
13. क्रेनवर सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविणे बंधनकारक आहे.तसेच त्याचा बॅकअप कमीत कमी 30 दिवस राहील. तीस दिवसांचा बॅकअप व्यावसायिक स्वखर्चाने पोलीस निरीक्षक,जिल्हा वाहतुक शाखा, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयास प्रत्येक महिन्यास 5 (पाच) तारखेपर्यंत सादर करतील.
14. वाहतूक शाखेच्या शहरातील एका विभागातून दुसऱ्या विभागाकडे क्रेन पाळीप्रमाणे काम करीत राहील. तसेच पोलीस निरीक्षक / उपनिरीक्षक हे जो विभाग / रस्ता सांगतील त्या ठिकाणी क्रेन पाठवावी लागेल.
15. क्रेनमध्ये कोणताही तांत्रिक बिघाड असता कामा नये. क्रेन तांत्रिक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. प्रत्येक महिन्याला क्रेनची तपासणी करून घेण्यात यावी. पोलीस उपअधीक्षक लोणावळा हे क्रेनची तपासणी करतील. क्रेनमधील बिघाड व क्रेनवरील स्थगिती ही आठ दिवसांपेक्षा जास्त असता कामा नये, ज्या वेळी क्रेनची आवश्यकता असेलत्यावेळी क्रेनची मागणी केली असता क्रेन तात्काळ उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. क्रेन कर्तव्यावर रुजू होण्याआधी ON POLICE DUTY या नावाचा फलक क्रेनच्या दर्शनी भागावर असावा व पोलीस कर्तव्याशिवाय इतर वेळी तो फलक वाहतूक शाखेत काढून ठेवावा.
16. क्रेनवर कर्तव्यास असलेल्या पोलीस कर्मचारी यांचे आदेशाशिवाय कोणतेही वाहन उचलू नये अथवा उचललेले वाहन परस्पर पैसे घेऊन सोडू नये. क्रेन मालकांनी संबंधित वाहन चालकास देत असलेल्या पावत्यांचे पावती पुस्तक स्वत: बनवायचे आहे. सदर पावती पुस्तक पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून साक्षांकित करून घेणे आवश्यक आहे. पुर्ण झालेली पावती पुस्तके पोलीस ठाणे कारकून यांचेकडे जमा करावीत, पो.ठाणे कारकून यांनी सदरची पावती पुस्तके जमा करून घेऊन त्याचा अहवाल पोलीस अधीक्षक कार्यालयास दर महिन्याचे 5 तारखेपर्यंत सादर करावा.
17. अतिलात्काळ प्रसंगासाठी क्रेनची आवश्यकता भासल्यास रात्रीचे वेळी कर्तव्य बजावण्यास क्रेन पाळीप्रमाणे रात्रपाळीसाठी वापरण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

18. क्रेनकडून रोजच्या रोज उचलण्यात आलेल्या वाहनाचे नियमानुसार ठरवून दिलेले भाडे संबंधित वाहन चालकाकडून रितसर वसूल करून पावती देणेची आहे. वाहने उचलण्यासाठी वाहतूक शाखा /पोलीस ठाणे / शासनाकडून क्रेनसाठी वेगळे मासिक / दैनिक कोणतेही भाडे देण्यात येणार नाही.

19. पावतीवरील रकाने अर्धवट न सोडता संपूर्णपणे भरावेत. वाहन उलणेपूर्वीच नमूद वाहनाचे नुकसान झालेचे दिसून आलेस फोटो घेऊन तशा पावतीवर नोंदी करतील. प्रत्येक वाहन उचलण्यापूर्वी वाहनाचा सुस्पष्ट फोटो काढतील याबाबतची पुर्तता व सुविधा क्रेन मालकांनी करावयाची आहे.

20. क्रेन चालकाव्यतिरीक्त क्रेनवर तीन कर्मचारी ठेवण्यात यावेत. व्यावसायिक यांनी चालक व कामगारांचा अपघात विमा काढणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांची नागरिकांशी वर्तणूक सौजन्याची राहील याची दक्षता क्रेन मालक घेतील. गैरवर्तणूकीच्या कारणामुळे काढले असेल अशा कर्मचाऱ्यास पुन्हा कार्यालयाच्या परवानगीशिवाय कामावर घेता येणार नाही. क्रेनवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार हा क्रेन मालकाने द्यावयाचा असून शहर वाहतूक शाखा / पोलीस ठाणे अथवा शासनाकडून त्यांचा पगार देण्यात येणार नाही. क्रेन चालक हा क्रेन वापरात तज्ञ असावा. क्रेन वाहनाचा संपूर्ण देखभाल खर्च हा क्रेन मालकांनीच करावयाचा आहे. त्याबाबत शहर वाहतूक शाखा / पोलीस ठाणे / शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत अगर तरतूद करण्यात येणार नाही.

21. क्रेन वाहन अचानक नादुरूस्ती झाल्यास व दुरूस्तीसाठी बंद ठेवावयाचे असल्यास क्रेन मालक कार्यालयांस लेखी स्वरुपात अगाऊ कळवून कार्यालयाच्या परवानगीने पर्यायी सुस्थितीतील वाहनांची 2 दिवसात सर्व कागदपत्रांसह व्यवस्था करावयाची आहे. क्रेन वाहनाची मागणी केल्यानंतर ते उशिरा पोहोचल्यास तसेच ठरवून दिलेल्या अटींचा भंग केल्यास सदरचा करार केव्हाही रद्द करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांना राहील.

22. क्रेन मालकांनी आपले वाहन वाहतूक शाखेच्या परवानगीशिवाय परस्पर इतरांना भाडयाने दिल्यास अथवा विक्री केल्यास सदर बाबतचा करार कायमस्वरुपी खंडित करण्यात येईल.

23. दुचाकी वाहन उचलल्यानंतर ते वाहवून नेताना दोन वाहनांचे परस्परात घर्षण होणार नाही व त्यामुळे वाहनांचे नुकसान होणार नाही यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी किंवा रबरी पॅडींगचा वापर करावा.

24. उचललेल्या वाहनांचे नुकसान झाल्यास संबंधित नुकसानीची जबाबदारी संबंधित क्रेन व्यावयसायिकांची राहील. तसेच त्या संदर्भात वाहन चालकाची क्रेन पावतीवर सही घेण्यात यावी.

25. व्हीआयपी बंदोबस्तासाठी तसेच इतर आकस्मिक तातडीचे कारणासाठी वाहने काढणेकरीता शहर वाहतूक शाखा / पोलीस ठाणेकडून / क्रेनचा वापर केल्यास ते काम विनामोबदला करावयाचे आहे. त्याबाबत कोणतेही भाडे अथवा मोबदला देण्यात येणार नाही.

26. टोईंग केलेल्या / उचललेल्या वाहनाचे चार्जेस क्रेन मालक यांनी संबंधित वाहन चालकाकडून निश्चित करून दिलेल्या रक्कमेनुसार वसूल करावयाचे आहे.



Scanned with OKEN Scanner

27. क्रेनचे ड्रायव्हर व क्लिनर यांनी कर्तव्यावर असताना वाहतूकीचे नियम पाळणे बंधनकारक राहील. नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यांचेवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल. क्रेन चालकाचा परवाना व क्रेनची सर्व कागदपत्रे नियमितपणे ठेवणे आवश्यक आहे.

28. सदरचा करार हा प्रत्यक्षात करार झालेल्या तारखेपासून एक वर्षाकरीता अस्तित्वात राहील. दरम्यान कालावधीत संबंधित क्रेन मालकांनी त्यांच्या घालून दिलेल्या अटी व शर्तीचा भंग केल्यास तसेच तत्कालीन उद्‌भवलेल्या अनुचित कारणामुळे सदरचा करार कोणतीही पूर्वसुचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांना आहेत.

29. क्रेन व्यावसायिकांनी प्रत्येक महिन्याच्या 15 तारखेस आणि महिन्याच्या शेवटच्या तारखेस क्रेनने ओढून नेलेल्या आणि वसूल करण्यात आलेल्या रक्कमेबाबतचा तपशील खाली नमूद विवरणपत्रात वाहतूक शाखा व पोलीस अधीक्षक कार्यालयास सही शिक्क्यानिशी सादर करावा.

| अ.क्र. | तारीख व वेळ | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वाहन ओढून नेलेले ठिकाण | क्रेनवरील पोलीस कर्मचाऱ्यांचे नांव | वसूल केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|

30. क्रेन व्यावसायिकांनी क्रेन वापराबाबत शासनाकडून व पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून वेळोवेळी जे काही निर्देश देण्यात येतील त्याप्रमाणे ते पालन करण्याचे बंधन राहील.

31. निविदाधारक शासकिय अथवा निमशासकिय संस्थेच्या काळया यादीत समाविष्ट असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची ई-निविदा असेल त्या स्तरावर रद्द करण्यात येईल. सबब निविदाधारक शासकिय अथवा निमशासकिय संस्थेच्या काळया यादीत समाविष्ट नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

32. कार्यालयास व मंजूर दरपत्रक धारकास मान्य होतील अशा अटी व शर्ती करारनामा करावा लागेल.प्रस्तुतचा करारनामा हा एक वर्षाकरीता राहील, सदर कराराचा कालावधी वाढविणेचा /कमी करणेचा हक्क कार्यालय राखून ठेवीत आहे.

33. सदर निवीदेतील अटी व शर्ती यामध्ये बदल करण्याचे अधीकार तसेच निवीदा प्रक्रियेतील काही भाग अथवा पूर्ण निवीदा प्रक्रिया कोणतेही कारण नमुद न करता अगर पुर्वसुचना न देता रद्द करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक , पुणे ग्रामीण हे राखून ठेवत आहेत.

34. .ज्या निवीदाकाराची तांत्रीक निवीदा छाननी समितीने मंजूर केलेली असेल त्यांचीच व्यावसायीक निवीदा (दरपत्रक) उघडण्यात येईल.

35. निवीदेसंदर्भातील सर्व निर्णय पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे घेतील व ते सर्व निवीदाकार यांचेवर बंधनकारक असतील.

36. कोणतेही दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता सदर दरपत्रक सुचना पुढे ढकलणे किंवा रद्द करणे यांचे अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखून ठेवले आहेत. तसेच अशा मंजूर किंवा नामंजूर दरपत्रकबाबत कोणतेही स्पष्टीकरण पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण हे इतर दरपत्रककारांना देणार नाहीत.



Scanned with OKEN Scanner

**क) दरपत्रक दाखल करण्याची पध्दती :-**

1) दरपत्रकाची संपुर्ण माहिती , अटी व शर्ती www.puneruralpolic.gov.in या वेब साईटवर फक्त पाहण्यास उपलब्ध आहेत.

2) लिफाफा क्रमांक 1 मध्ये तांत्रीक माहीती खालीलप्रमाणे देण्यात यावी.

पुरवठादार / दरपत्रककारांनी सोबत जोडावयाची कागदपत्रे.

अ)दरपत्रककार कंपनीचे पुर्ण नाव व पत्ता दुरध्वनी व ई मेलसह (कंपनीचे लेटरहेडवर )

आ)दरपत्रककार कंपनीचे मालकाचे /भागीदारांचे/ संचालकांचे पुर्ण नाव व पत्ते दुरध्वनीसह (कंपनीचे लेटरहेडवर)

इ) दरपत्रककार कंपनीचे व्यवसाय नोंदणीप्रमाणपत्र (Company in corporation/ shop Act)

ई) दरपत्रककार कंपनीचे /मालकाचे PAN Card/ Tan Card

उ) दरपत्रककार कंपनीचे मागील तीन वर्षाचे Income Tax Return

ऊ)दरपत्रककार कंपनीचे GST Registration Certificate.

ए) दरपत्रककार कंपनी किंवा त्यांचे मालक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फसवणूकीची /गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू/प्रलंबित नसली पाहीजे. तसेच दरपत्रककार कंपनीचा समावेश सरकारी काळया यादीत नसला पाहीजे.अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र रुपये १००/-च्या स्टॅप पेपरवर देणे बंधनकारक आहे. (नमुना सोबत जोडला आहे.)

**परिशिष्ट-२ (मालकाचे /भागीदार/संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)**

**प्रतिज्ञापत्र (रुपये १०० च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------------------------------------------------- (मालकाचे/भागीदारांचे/संचालकांचे नाव व पत्ता )------------------ ------------------------------------ पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण घटकातील लोणावळा शहर पोलीस ठाणे हददीमध्ये वाहतुक आराखडयाच्या अनुषंगाने हददीमध्ये रस्त्यावर किंवा रस्त्याच्या बाजुला अनधिकृत पार्कींग केलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी दोन चाकी वाहने उचलुन आणणेकरीता एक क्रेन वाहन आणि चार चाकी वाहन टो करून ओढून आणणेकरीता एक हायड्रोलीक क्रेन अशी एकुण 02 क्रेन वाहने एक वर्षाकरीता वार्षिक भाडे करारावर तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा करणेबाबत सेवा संविदा कराराची निवीदा/दरपत्रक भरत असुन या --------------------------------------------- (निवीदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ---------------------------------------------या नावाने भरत आहोत. मि/आम्ही तसेच माझी कंपनी यांचेविरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निवीदा/दरपत्रक भरण्याच्या दिनांक रोजीपर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफरातफर, गैरव्यवहार, फसवणूक तसेच भ्रष्टाचार याविषयी कोणतीही चौकशी चालू नाही किंवा प्रलंबित नाही. तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे /आमचे जवळचे नातेवाईक (आई/वडील/पत्नी/पती/भाऊ/बहीण ) यांचेविरोधात सुध्दा चालू नाही.

सही

दरपत्रककार / निविदाकार कंपनीचे मालक/भागीदार/संचालक

**परिशिष्ट - ३ (मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)**

**प्रतिज्ञापत्र (रु. १०० च्या मुद्रांकावर)**

मी / आम्ही ------------(मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता)------------------------------------ पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण घटकातील लोणावळा शहर पोलीस ठाणे हददीमध्ये वाहतुक आराखडयाच्या अनुषंगाने हददीमध्ये रस्त्यावर किंवा रस्त्याच्या बाजुला अनधिकृत पार्कींग केलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी दोन चाकी वाहने उचलुन आणणेकरीता एक क्रेन वाहन आणि चार चाकी वाहन टो करून ओढून आणणेकरीता एक हायड्रोलीक क्रेन अशी एकूण 02 क्रेन वाहने एक वर्षाकरीता वार्षिक भाडे करारावर तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा करणेबाबत पुरवठ्याची निविदा दरपत्रक या ---------------- (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ------------ नावाने भरत आहोत. निविदेमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे क्रेन पुरवठा व सेवा Warranty / Guaranty कालावधीमध्ये वाहतुक शाखा यांच्या कडे Onsite पध्दतीने २४ तास ३६५ दिवस देऊ.

सही

दरपत्रककार / निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक



Scanned with OKEN Scanner

ऐ) दरपत्रककार कंपनीस सदर कामाचा 3 वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.

ओ) क्रेन वाहन व हायड्रोलीक क्रेन वाहन याचे मालकी दर्शविणारे कागदपत्रे (RCबुक ).

औ) क्रेन वाहन व हायड्रोलीक क्रेन वाहन याचे कोणत्याही प्रकारचा दंड अथवा गुन्हा नसलेबाबतचे सदर वाहनाचे येणेबाकी नसलेचे प्रमाणपत्र व विमा कागदपत्रे.

अः) सदर वाहनाचे नोंदणी पुस्तकामध्ये सदर वाहन व्यावसायिक असलेची नोंद असणे आवश्यक असुन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कडील वाहनाचे फिटनेस योग्यता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

3) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे यांचे नावे दरपत्रकाचे सिलबंद तांत्रीक व व्यावसायीक लिफाफा /पाकिटे हि पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतुक शाखा, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर, पाषाणरोड, पुणे यांचे कार्यालयात सादर करावीत.

4) टोईंग व्हॅन भाडयाने पुरवठयासाठी कार्यालयाचा पत्ता - पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतुक शाखा, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे

5) टोईंग व्हॅन भाडयाने कामकाजासाठी पत्ता - लोणावळा शहर पोलीस ठाणे हददीमध्ये वाहतुक आराखडयाच्या अनुषंगाने हददीमध्ये रस्त्यावर किंवा रस्त्याच्या बाजुला अनधिकृत पार्कींग केलेल्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी.

6) लिफाफा क्र. 2 व्यावसायीक मध्ये दोन चाकी वाहने उचलुन आणणेकरीता एक क्रेन वाहन आणि चार चाकी वाहन टो करून ओढून आणणेकरीता एक हायड्रोलीक क्रेन याचे भाडे दर कंपनीच्या लेटरहेडवर छापील स्वरुपात सही व शिक्यानिशी देण्यात यावेत.

7) उपरोक्त नमुद केलेल्या पध्दतीने सादर न झालेले दरपत्रक नाकारण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

**ड) दरपत्रक दाखल करणे/निवीदा उघडणे याबाबतचा तपशील** :-

| | | |
|---|---|---|
| 1 | दरपत्रक मागविण्याचा दिनांक | दिनांक **20/06/2023** ते दिनांक **27/06/2023 कार्यालयीन वेळेत (शासकि य सुटटीचे दिवस वगळून )** |
| 2 | दरपत्रक दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक **27/06/2023 दुपारी 11.00** वाजेपर्यंत |
| 3 | दरपत्रक पुर्व बेठक (Pre Bid Meeting) | दिनांक **16 /06/2023 दुपारी 13.00** वाजता पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात होईल. |
| 4 | दरपत्रकउघडण्याचा दिनांक व वेळ | तांत्रीक निवीदा-दिनांक **29/06/2023** रोजी **सकाळी 11.30** वाजता हजर दरपत्रककार यांचे प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील. व्यावसायीक दरपत्रक-ज्या दरपत्रककारांच्या तांत्रीक निवीदा मंजूर होतील, अशा दरपत्रककारांना व्यावसायीक दरपत्रक दिनांक **29/06/2023 रोजी 16.00 वा.**उघडण्यात येतील. |
| 5 | संपर्क अधिकारी | 1. श्री. बापूसाहेब पोपट सांडभोर, पोलीस निरीक्षक,जिल्हा वाहतुक शाखा, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे भ्रमणध्वनी क्रमांक 8433815833<br>2.श्री. व्ही.पी. चव्हाण,व.श्रे.लिपीक, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय, पाषाण रोड, पुणे भ्रमणध्वनी क्रमांक 9021749269 |

प्रस्तावीत करारासंबधी काही शंका असल्यास त्याच्या निराकरणासाठी पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात उपरोक्त नमुद केलेल्या संपर्क अधिकारी यांचेशी कार्यालयीन वेळेत संपर्क करावा .

crane LONAVALA

Scanned with OKEN Scanner

**लखोटा क्र.1(तात्रिक)उघडण्याबाबत-**

लखोटा क्र.1(तात्रिक) हा दि.01/12/2016 च्या उद्योग व उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील सुचनेनुसार गठीत केलेले समितीसमोर उघडण्यात येईल. तसेच त्यासाठी दरपत्रककारांना आमंत्रित केले जाईल.दरपत्रककार स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी सदर वेळी उपस्थित राहु शकतात. सदर दरपत्रक तात्रिक अडचणीमुळे दरपत्रककार यांच्या समोर उघडण्यात येतीलच असे नाही. यंत्रणेच्या उपलब्धतेनुसार पोलीस अधीक्षक कार्यालय या ठिकाणी उघडल्या जातील.त्यासंदर्भात कोणतीही तक्रार चालणार नाही.जे दरपत्रककार उपस्थित राहणार नाहीत त्यांना सदर प्रक्रियेमध्ये कोणतीही तक्रार करता येणार नाही. तसेच लखोटा क्र.1(तात्रिक) मधील सर्व कागदपत्रांची तपासणी समितीमार्फत केली जाईल.त्यासाठी गरज असलेस जास्तीचा वेळ मागुन घेण्यात येईल.कागदपत्रांची तपासणी दरपत्रककारांसमोरच करण्याचे बंधन समितीवर नसेल.समितीच्या वेळेनुसार व गरजेनुसार कागदपत्रांची छाननी व तपासणी केली जाईल तसेच त्याबाबतीत अंतिम निर्णय पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण हे समितीचे अध्यक्ष या नात्याने घेतील व तो निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल.समितीचा निर्णय यथावकाश सर्व दरपत्रकधारकांना कळविण्यात येईल.

**नोट:-** पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय हे कायदा व सुव्यवस्थेचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे काम करित असल्यामुळे दरपत्रक उघडण्याची दिलेली तारिख व वेळ कधीही बदलु शकते याची नोंद घ्यावी.

**दरपत्रक प्रक्रियेबाबत अथवा दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकांबाबतचे तक्रारीबाबत.-**

दरपत्रक प्रक्रियेमध्ये दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रकधारकांवर तक्रार दाखल करणा-या तक्रार धारकास रु.50000/-इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल.जर तक्रारीमध्ये तथ्य आढळलेस संबंधीत तक्रारदाराची अनामत रक्कम परत करुन आरोप सिध्द झालेले दरपत्रकधारकास दरपत्रक प्रक्रियेमधुन वगळण्यात येऊन त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.(उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-2014/प्रक्र.82/उद्योग -4,दि.1/12/2016 मधील 5.8.2,नुसार पा.क्र.76 )

**दरपत्रक प्रक्रियेबाबतचे स्पष्टीकरण:**

दरपत्रक प्रक्रियेबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबंधीत दरपत्रककाराने अथवा दरपत्रक भरु इच्छिना-या दरपत्रककारांनी सदरची शंका अथवा तक्रार दरपत्रक भरण्याच्या अंतिम दिनांक व वेळेपुर्वी किमान 2 दिवस अगोदर लेखीस्वरुपात या कार्यालयास सादर करावी.त्यानंतर आलेल्या कोणत्याही शंका अथवा तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

**( अंकित गोयल )भा.पो.से.**
**पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण**

crane LONAVALA

Scanned with OKEN Scanner